**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक ६ फेब्रुवारी २०२५**

**ठळक बातम्या**

1. मध्यमवर्गाचे सामर्थ्य वाढविण्यावर अर्थसंकल्पात भर देण्यात आल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे राज्यसभेत प्रतिपादन.
2. औद्योगिक जमीन वापरासाठी एनए परवानगी आवश्यक नाही- महसूलमंत्री चन्द्रशेखर बावनकुळे यांचा निर्णय.
3. वर्धा जिल्हा शेतकरी आत्महत्यामुक्त करण्यासाठी 'पीडीकेव्ही'चे सहकार्य घेणार- पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांची माहिती.
4. नागपूरच्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात इंग्लंडचे भारतापुढे २४९ धावांचे उद्दिष्ट, सामन्यासाठी कडक सुरक्षा व्यवस्था आणि ट्रॅफिक बंदोबस्त.

-------------------------------

**नरेंद्र मोदी आभार प्रस्ताव**

सरकारच्या प्रयत्नांमुळे एक मोठा वर्ग गरिबी रेषेच्या बाहेर आला असून निओ - मिडलक्लास कडे वळत आहे. आपल्या सरकार भक्कमपणे निओ मिडलक्लास आणि मध्यमवर्ग यांच्या पाठीशी असल्याचे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज केलं. राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज राज्यसभेत उत्तर दिलं त्यावेळी ते बोलत होते. याविषयी पुढे संबोधित करताना ते म्हणाले की -

*(हमारी निओ मिडल क्लास और मिडल क्लास की आकांक्षाएं आज देश के लिए गति देने वाली शर्त है। हमारे देश की एक नई ऊर्जा है, देश की प्रगति का सबसे बड़ा आधार है। हम मिडिल क्लास के निओ मिडिल क्लास के सामर्थ्य को बढ़ाना चाहते हैं। हमने।मिडिल क्लास के लिए एक बहुत बड़े हिस्से को टैक्स में इस बजट में जीरो कर दिया है।)*

याशिवाय विविध सरकारी योजना, आयात- निर्यात, पर्यटन क्षेत्र, समाजातील मागासवर्गासाठीच्या योजना याबद्दल देखील पंतप्रधानांनी अभिभाषणाच्या माध्यमातून चर्चा केली. बातमी लिहून होत पर्यंत पंतप्रधानांचे संबोधन सुरु होते.

-------------------------------

**परीक्षा पे चर्चा**

परीक्षा पे चर्चा कार्यक्रम १० फेब्रुवारी रोजी नवी दिल्ली इथं भारत मंडपमध्ये आयोजित करण्यात येणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासमवेत विविध क्षेत्रातील तज्ज्ञ या कार्यक्रमात सहभागी होऊन विद्यार्थ्यांच्या विविध समस्यांचं निराकरण करतील. ३६ विद्यार्थी पंतप्रधानांसोबत थेट संवाद साधणार आहेत. यावर्षी विविध माध्यमांतून सहभागी विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांची विक्रमी संख्या पाच कोटी एवढी आहे.

-------------------------------

समुपदेशकांची नियुक्ती

दहावी आणि बारावीच्या राज्य मंडळाच्या परीक्षा येत्या ११ फेब्रुवारीपासून सुरु होत आहेत. परीक्षा काळात विद्यार्थ्यांचे समुपदेशन करण्यासाठी राज्य मंडळस्तरावर समुपदेशकांची नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती राज्य मंडळ सचिव डॉ. माधुरी सावरकर यांनी दिली. सकाळी ८ ते रात्री ८ या कालावधीत विद्यार्थ्यांना भ्रमणध्वनीद्वारे निःशुल्क आवश्यक ते समुपदेशन मिळणार असल्याचं सावरकर यांनी सांगितलं.

-------------------------------

बिगरशेती (एनए) परवानगी

औद्योगिक जमिनीचा वापर करावयाचा असल्यास त्यासाठी बिगरशेती (एनए) परवानगी आवश्यक असणार नाही. याकरिता महाराष्ट्र जमीन महसूल संहितेत बदल करण्यात येणार आहे.भारत सरकारच्या उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभागाच्या व्यापार सुलभता (इज ऑफ डुईंग बिझनेस) या महत्त्वाकांक्षी उपक्रमाचा भाग म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे. यापूर्वी जमीनधारकांना औद्योगिक वापरासाठी मानीव अकृषिक वापराची परवानगी घेणे आवश्यक होते; परंतु, त्यासाठी लागणारा वेळ हा जमीन एनए करण्यासाठी लागणाऱ्या वेळेएवढाच आहे, हे शासनाच्या निदर्शनास आल्याने हा निर्णय घेण्यात आला आहे.जमिनीचा उद्योगासाठी वापर करावयाचा असल्यास परवानगीची तरतूद रद्द होण्यासाठी काही काळाचा अवधी लागणार असल्याने तोपर्यंतच्या कालावधीत एखाद्याला जमीन उद्योगासाठी वापरायची असल्यास त्यालाही एनए परवानगी घेणे आवश्यक नाही. त्यासाठी या उद्योग घटकाने सक्षम नियोजन प्राधिकरणाकडून विकास परवानगी (Development permission) घेतल्यानंतर किंवा नियोजन प्राधिकरणाकडून बांधकाम आराखडे मंजूर करून घेतल्यानंतर त्याची नोंद करण्यासाठी संबंधित ग्राम महसूल अधिकाऱ्याकडे (तलाठी) जावे. त्यानंतर त्या ग्राम महसूल अधिकाऱ्याने

लवकरात लवकर ती नोंद त्याच्या दप्तरात करावी, असेही या परिपत्रकात म्हटले आहे.

-------------------------------

पंकज भोयर

वर्धा जिल्हा शेतकरी आत्महत्यामुक्त करण्यासाठी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या तज्ज्ञांचे सहकार्य घेऊन त्यानुसार जिल्ह्यात योजना, उपक्रम राबविण्यात येतील. त्यासाठी शासन स्तरावरून, तसेच जिल्हा नियोजन समितीकडून आवश्यक निधी उपलब्ध करून देऊ, अशी ग्वाही गृह (ग्रामीण), शालेय शिक्षण व सहकार राज्यमंत्री तथा वर्धा जिल्ह्याचे पालकमंत्री पंकज भोयर यांनी आज दिली.डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला येथे वर्धा जिल्ह्याच्या कृषी विकासासाठी एकात्मिक कृषी विकास आराखडा तयार करण्याबाबत समिती कक्षात चर्चा झाली, त्यावेळी ते बोलत होते. कुलगुरू डॉ. शरद गडाख, कुलसचिव सतीश ठाकरे, आदी उपस्थित होते.वर्धा जिल्हा शेतकरी आत्महत्यामुक्त करण्याचा निर्धार असून त्यासाठी आवश्यक पावले उचलण्यात येतील. योजना- उपक्रमांसाठी निधीची उणीव भासू देणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली.

-------------------------------

डॉ. अशोक उईके

आदिवासीबहुल गडचिरोली जिल्ह्यातील विकासाला गती देण्यासाठी आणि आदिवासी समाजाच्या उन्नतीसाठी जिल्हा प्रशासनाने ४८२ कोटी ३६ लाख रुपये इतक्या निधीच्या प्रारूप आराखड्याची मागणी शासनाकडे सादर केली आहे. हा आराखडा जिल्हा वार्षिक योजना २०२५-२६ अंतर्गत आदिवासी उपयोजना आणि आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना यासाठी प्रस्तावित करण्यात आला आहे. या संदर्भात आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांच्या अध्यक्षतेखाली आज राज्यस्तरीय आढावा बैठक घेण्यात आली.

-------------------------------

दादा भुसे

शिक्षक हा शिक्षण विभागाचा मानबिंदू तर विद्यार्थी हे दैवत आहे. विद्यार्थ्यांची शाळेतील पटसंख्या वाढविण्यासह त्यांच्या मनात शिक्षणाविषयी अधिक गोडी निर्माण व्हावी यासाठी शिक्षकांचे योगदान महत्वाचे आहे. बदलत्या तंत्रज्ञानाप्रमाणे मुलांची आकलन क्षमता व नवतंत्रज्ञान जाणून घेण्याच्या उत्सुकतेला शिक्षकांनी नविण्यपूर्ण उपक्रमाची जोड द्यावी, असे आवाहन शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी केले. सिव्हील लाईन्स येथील सेंट उर्सूला गर्ल्स हायस्कूल येथे नागपूर विभागातील

उपक्रमशिल शिक्षक या विषयावर विभागातील सर्व शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी व प्रयोगशिल शिक्षक यांच्यासाठी चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्रात ते बोलत होते.

-------------------------------

बुद्धांच्या अस्थी

रमाबाई आंबेडकर यांचा जयंती निमित्त आज नागपूरातील दीक्षाभूमीवर थायलंड वरून आलेल्या भगवान गौतम बुध्दांच्या अस्थींचे आगमन झाले. अस्थींचे दर्शन घेण्यासाठी शेकडो बौध्द अनुयायांनी दीक्षाभूमीवर गर्दी केली. महाबोधी चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष भदंत हर्षबोधी यांचा नेतृत्वात तथागत बुद्धांच्या अस्थी दीक्षाभूमीवर आणण्यात आल्या असुन उद्या या अस्थी अमरावती मध्ये आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ठेवल्या जाणार आहे. तत्पूर्वी दीक्षाभूमी स्मारक समिती आणि भिक्खू संघातर्फे भगवान गौतम बुद्धांच्या अस्थी समोर बुद्ध वंदना घेण्यात आली.

-------------------------------

क्रिकेट

भारत आणि इंग्लंड दरम्यान तीन एकदिवसीय सामन्यांच्या क्रिकेट मालिकेतल्या पहिल्या सामना आज नागपूरच्या जामठा इथल्या व्हीसीए मैदानावर खेळाला जात आहे. दुपारी दीड वाजता सुरू झालेल्या या सामन्यात नाणेफेक जिंकून इंग्लंडने प्रथम फलंदाजी स्वीकारली आहे. भारतीय संघाचं नेतृत्व रोहित शर्मा करत असून इंग्लंडच्या संघाची धुरा जोस बटलर याच्यावर आहे. इंग्लंडच्या संघाने भारतीय संघापुढे 249 धावा करण्याचं उद्दिष्ट ठेवलं. भारतातर्फ़े हर्षित राणा याने ३ गडी तर रवींद्र जडेजा याने देखील ३ गडी बाद केले. इंग्लंड तर्फे कर्णधार जोस बटलर आणि जॅकोब बेथेल यांनी अर्धशतकी खेळी केली. उर्वरित खेळाडू धावसंख्येत विशेष भर घालू शकले नाही. दरम्यान भारताच्या संघाने खेळायला सुरवात केली असून शेवटचे वृत्त हाती आले तेव्हा भारताच्या चौथ्या षटकात, एक गडीबाद एकोणविस धावा झाल्या होत्या. या मालिकेतला दुसरा सामना येत्या रविवारी कटकमध्ये तर शेवटचा सामना १२ फेब्रुवारीला अहमदाबादमध्ये होणार आहे.दरम्यान, स्टेडियमवर 2000 पोलिसांचा बंदोबस्त आहे. सामना संपल्यावर वर्धा मार्गावर वाहतूक कोंडी होऊ नये त्यासाठी वाहतूक शाखेने नियोजन केलं असून जवळपास 600 पोलीस कर्मचारी झिरो माइल चौक ते जामठा स्टेडियम पर्यंत तैनात राहणार आहे.

-------------------------------

द्वारकानाथ संझगिरी निधन

**ज्येष्ठ क्रीडा आणि चित्रपट समीक्षक, लेखक द्वारकानाथ संझगिरी यांचं आज प्रदीर्घ आजारानं निधन झालं. ते ७४ वर्षांचे होते. संझगिरी यांच्यावर मुंबईतल्या लीलावती रुग्णालयात उपचार सुरू होते. शिक्षणानं अभियंता असणारे संझगिरी हे मुंबई महापालिकेत मुख्य अभियंता म्हणून कार्यरत होते. क्रीडा आणि चित्रपट या विषयांवरील त्यांचं समीक्षण वाचकांच्या विशेष पसंतीला उतरलं. संझगिरी यांच्या पार्थिवावर उद्या दुपारी १२ वाजता दादर स्मशानभूमीत अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.**

**------------------------------**